दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 247, Marathi Daily Friday, Date - 27 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २४७ वा | मराठी दैनिक | शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# ‘मी शंकर, तू पार्वती’ म्हणत फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात भोंदू बाबांच्या नावाखाली सुरू असलेल्या फसवणूक आणि लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाची चर्चा अद्याप थांबलेली नसतानाच आता वसईतील आणखी एका स्वयंघोषित धर्मगुरूचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ऋषिकेश वैद्य असे या आरोपीचे नाव असून त्याने ‘मी शंकर आहे आणि तू माझी पार्वती आहेस’ असे सांगून एका विवाहित महिलेची फसवणूक करत तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी वसईच्या माणिकपूर पोलीस ठाण्यात बलात्कार, फसवणूक, धमकी आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहिली घटना पुण्यातील मांजरी परिसरात घडल्यामुळे तपासासाठी हे प्रकरण पुणे पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे. तक्रारीनुसार, पीडित महिला ही पुण्यात वास्तव्यास असलेली ३५ वर्षीय विवाहित असून २०२३ मध्ये तिची आरोपी ऋषिकेश वैद्य याच्याशी फेसबुकवर ओळख झाली. वैद्य हा स्वतःला धार्मिक गुरु, अध्यात्मिक मार्गदर्शक आणि ‘आमची वसई’ या संस्थेचा प्रमुख असल्याचे सांगत असे. सोशल मीडियावर धार्मिक आणि अध्यात्मिक पोस्ट टाकून तो महिलांचा विश्वास संपादन करत होता. पीडित महिलेची धार्मिक वृत्ती ओळखून त्याने तिच्याशी संवाद वाढवला आणि तिला ‘विशेष आध्यात्मिक साधना’ शिकवण्याचे आमिष दाखवले.

काही दिवसांच्या संवादानंतर डिसेंबर २०२३ मध्ये वैद्य पुण्यात आला. त्या वेळी त्याने महिलेला प्रत्यक्ष भेटून स्वतःला भगवान शंकराचा अवतार असल्याचे सांगितले. ‘तू माझी पार्वती आहेस, आपल्या पूर्वजन्मीचे नाते आहे’ अशा प्रकारच्या धार्मिक आणि भावनिक गोष्टी सांगून त्याने महिलेला मानसिकरीत्या प्रभावित केले. तिच्या श्रद्धेचा आणि विश्वासाचा गैरफायदा घेत तिला मांजरी येथील एका लॉजमध्ये नेण्यात आले.




तेथे आरोपीने महिलेला गुंगीकारक पदार्थ दिल्याचा आरोप आहे. त्यानंतर तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करण्यात आले. या घटनेदरम्यान आरोपीने तिच्या नकळत अश्लील छायाचित्रे आणि व्हिडिओ तयार केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. नंतर या फोटो-व्हिडिओंचा आधार घेत आरोपीने महिलेला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

महिलेने विरोध करण्याचा प्रयत्न केल्यास हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत आरोपी तिला वारंवार भेटण्यास भाग पाडत होता. या दबावामुळे पीडित महिला मानसिक तणावाखाली होती. मे २०२५ मध्ये आरोपीने पुन्हा वसईतील एका हॉटेलमध्ये तिला बोलावले आणि तिच्यावर पुन्हा अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी महिला कसाबसा तिथून निसटल्याचे सांगितले जाते. दरम्यान, नाशिकमधील अशोक खरात प्रकरण माध्यमांमध्ये समोर आल्यानंतर पीडित महिलेने धैर्य एकवटले. अशाच प्रकारे इतर महिलांची फसवणूक होत असल्याचे पाहून तिने अखेर आपल्या पतीला संपूर्ण प्रकार सांगितला. पतीच्या पाठिंब्याने त्यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात जाऊन अधिकृत तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून प्राथमिक तपास सुरू केला. पहिली घटना पुण्यात घडल्यामुळे कायदेशीर अधिकारक्षेत्रानुसार हे प्रकरण पुण्यातील मांजरी पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिरालाल जाधव यांनी याबाबत माहिती दिली.

## थोडक्यात...

### शासकीय निवासस्थानातील कथित व्हिडिओने खळबळ



**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटातील राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा कथित व्हिडीओ व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडावी. मंत्री नरहरी झिरवाळ आणि तृतीयपंथी व्यक्ती या व्हिडीओमध्ये दिसत आहे. शासकीय निवासस्थानातील हा व्हिडीओ असल्याचे कळतंय. तृतीयपंथी व्यक्ती आणि नरहरी झिरवाळ दोघे बेडवर दिसत आहेत. या कथित व्हिडीओने मोठी खळबळ उडाली. अगदी बेडरूममधील हा व्हिडीओ व्हायरल होत असल्याने नक्की हा नरहरी झिरवाळ यांचा व्हिडीओ कोणी रेकॉर्ड केला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण व्हायरल कथित व्हिडीओत काही गोष्टी रेकॉर्ड झाल्या. यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, मंत्री झिरवाळ, तृतीयपंथी व्यक्ती आणि अजून तिसराही कोणी व्यक्ती यादरम्यान रूममध्ये होता का? आता नुकताच मोठा खुलासा झाला असून हा व्हिडीओ नक्की कोणी रेकॉर्ड केला हे पुढे आलंय. समाज माध्यमांवर हा व्हिडिओ व्हायरल होत असून या कथित व्हिडिओची आम्ही पुष्टी करत नाही.

व्हायरल व्हिडीओबाबत नरहरी झिरवाळ यांनी अगोदरच कल्पना होती. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही घेतली. मंत्री झिरवाळ यांनी तृतीयपंथी जो झिरवाळ यांच्यासोबत व्हिडीओत दिसत आहे, त्याच्याविरोधात मुंबईतील कुरार पोलिस ठाण्यात खंडणी प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे.

तृतीयपंथी पवन यादव याच्यासोबत नरहरी झिरवाळ याने अनेकदा अनैतिक संबंध ठेवल्याचा दावाही रवी यादव याने केला आहे. पवन याला सरकारच्या तृतीयपंथी बोर्डात मोठे पद हवे असल्याने त्याचा आणि झिरवाळचा संबंध आल्याचे रवी यादव यांनी सांगितले. यादरम्यानच रवी यादव यांनी नरहरी झिरवाळ यांच्यावर अजून काही गंभीर आरोप केले आहेत. या कथित व्हायरल व्हिडीओनंतर विरोधक थेट मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत.

# नोकरीचे आमिष, दोन लाखांचा गंड

**पुणे । प्रतिनिधी**




जिल्हा सहकारी बँकेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका तरुणाची दोन लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी ऋषीकेश गणेश वाघमारे (रा. सपकाळवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवडमधील कासारवाडी येथे राहणाऱ्या एका तरुणाची आरोपी वाघमारे याच्याशी एका परिचितामार्फत ओळख झाली होती. वाघमारेने या तरुणाच्या पत्नीला पुणे जिल्हा सहकारी बँकेत नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. नोकरी लावण्यासाठी आरोपीने तरुणाकडून दोन लाख रुपये घेतले. त्यानंतर, गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आरोपीने तरुणाला पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या आवारात बोलावले. तिथे वाघमारेने मुख्य अधिकाऱ्यांच्या नावाने तयार केलेले बनावट नियुक्तीपत्र तरुणाला दिले.

तरुणाने या नियुक्तीपत्राची चौकशी केली असता, ते बनावट असल्याचे उघड झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने आरोपीकडे पैशांची मागणी केली. मात्र, वाघमारेने पैसे परत करण्यास टाळाटाळ केली.

या प्रकारानंतर, पीडित तरुणाने नुकतीच बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश चव्हाण करत आहेत.

# विवाहाच्या आमिषाने अत्याचार; पोक्सो अंतर्गत दोन गुन्हे दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील चंदननगर परिसरात अल्पवयीन युवतींवर बलात्कार झाल्याच्या दोन घटना उघडकीस आल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली आहे. चंदननगर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध बलात्कार आणि बालकांचे लैंगिक संरक्षण अधिनियमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पहिल्या घटनेत, एका अल्पवयीन युवतीच्या आईने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, आरोपी बालाजी गुरुनाथ स्वामी (वय २७, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वामीला युवती अल्पवयीन असल्याची माहिती होती. त्याने तिला जाळ्यात ओढून वेळोवेळी बलात्कार केला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर युवतीच्या आईने त्याला जाब विचारला असता, आरोपी स्वामी पीडित युवतीच्या घरात शिरला आणि तिची आई व वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली. सहायक पोलीस निरीक्षक विकास बाबर या प्रकरणाचा तपास करत आहेत.दुसऱ्या घटनेत, अल्पवयीन युवतीवर बलात्कार करून तिची छायाचित्रे समाज माध्यमात प्रसारित करण्याची धमकी देणाऱ्या ऋतिक रावसाहेब लोणके (वय २७, रा. सोमनाथननगर, वडगाव शेरी) याला अटक करण्यात आली आहे. पीडित युवतीने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लोणके याने पीडित



युवतीला विवाहाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केला. ही बाब युवतीच्या मावशीला समजल्यानंतर त्यांनी लोणके याला जाब विचारला. तेव्हा लोणके याने, मला तिच्याबरोबर बोलू दिले नाही, तर समाज माध्यमात युवतीची छायाचित्रे प्रसारित करेल, अशी धमकी दिली.

दरम्यान, पुणे शहरात अल्पवयीन मुलींना विवाहाचे आमिष दाखवून त्यांना पळवून नेण्याच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. वाघोली आणि हडपसर पोलीस ठाण्याात दोन अल्पवयीन युवतींना फूस लावून पळवून नेण्यात आल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.

# अपहृत व्यापाऱ्याची सुरक्षित सुटका

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात दीड कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण झालेल्या एका व्यापाऱ्याची गुन्हे शाखेने सुखरूप सुटका केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून अपहृत व्यापाऱ्याला वाचवण्यात यश आले. ही घटना २४ मार्च २०२६ रोजी घडली होती. गुलटेकडी परिसरात राहणाऱ्या या व्यापाऱ्याचे टिंबर मार्केट येथून काही अज्ञात व्यक्तींनी अपहरण केले होते. अपहरणानंतर आरोपींनी व्यापाऱ्याच्या पत्नीकडे तब्बल १ कोटी ५० लाख रुपयांची खंडणी मागितली होती. याप्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४०(२) आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरू केला. अपहृत व्यक्तीला कोणतीही इजा होऊ



नये यासाठी विशेष काळजी घेण्यात आली. तपासासाठी गुन्हे शाखेची तीन पथके वेल्हा, डोणजे आणि खेड शिवापूर परिसरात रवाना करण्यात आली होती. या पथकांनी मिळालेल्या माहितीचे जलद विश्लेषण करत शोधमोहीम राबवली.

दरम्यान, आरोपींनी खंडणीची रक्कम मित्र मंडळ चौक, स्वारगेट येथे आणण्यास सांगितले होते. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून एक पथक तिथे तैनात केले. ठरलेल्या वेळी रक्कम घेण्यासाठी आलेल्या प्रणव निवंगुणे आणि साहिल खुटवड या दोन संशयितांना पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. या दोघांच्या चौकशीतून सौरव पवार, शिरीष खोपडे आणि मंदार दारवटकर यांनी अपहरण केल्याचे उघड झाले. तसेच, अपहृत व्यापाऱ्याला सिल्व्हर रंगाच्या इटिओस कारमधून खेड शिवापूर येथे नेल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच सहायक पोलिस निरीक्षक अमोल रसाळ यांच्या पथकाने तात्काळ कारवाई करत आरोपींना घेराव घालून छापा टाकला. या धाडसी कारवाईत अपहृत व्यापाऱ्याची सुरक्षित सुटका करण्यात आली आणि तिन्ही मुख्य आरोपींना अटक करण्यात आली.


सदरची कारवाई वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून, पुढील तपास स्वारगेट पोलिस करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेले आरोपी सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर पुणे शहर आणि ग्रामीण भागात अनेक गुन्हे दाखल आहेत.

# गॅस बंद करण्याची धमकी; पुण्यात व्यक्तीची ४ लाखांची सायबर फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात गॅस पुरवठा खंडित करण्याची धमकी देऊन एका व्यक्तीची सायबर चोरट्यांनी ४ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. मॉडेल कॉलनीतील रहिवाशाला लक्ष्य करत ही घटना घडली असून, शिवाजीनगर पोलिसांनी अनोळखी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चतु:शृंगी पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर येथे राहतात, जिथे पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा होतो. सायबर चोरट्यांनी त्यांना गॅस बिल थकित असल्याचे आणि पुरवठा खंडित केला जाईल अशी भीती दाखवली.

थकित बिल त्वरित ऑनलाइन भरण्यासाठी बँक खात्याची माहिती द्यावी लागेल, असे चोरट्यांनी सांगितले. तक्रारदाराने आपली बँक खात्याची माहिती दिल्यानंतर, चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्याशी जोडलेला मोबाईल क्रमांक हॅक केला. यानंतर, त्यांनी बँक खात्यातून ३ लाख ९८




हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने दुसऱ्या खात्यात जमा केले. खात्यातून पैसे कमी झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदारांनी पोलिसांकडे धाव घेतली. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक अश्विनी ननावरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून गॅस आणि वीज देयक थकित असल्याचे सांगून पुरवठा खंडित करण्याची भीती दाखवून फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. नागरिकांनी अशा प्रकारच्या फोन कॉल्स किंवा मेसेजेसपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**जाहिर प्रगटन**

फक्त 300 रुपयात

दैनिक महिला संवाद मध्ये छोट्या जाहिराती आणि पॅनल जाहिराती अगदी स्वस्तात छापून मिळतील.

जाहीर प्रगटन, पाहिजेत, जन्मतारीख बदल, नावात बदल, मालमत्ता हस्तांतरण, खरेदी-विक्री व स्वरूपाच्या यासहित छोट्या जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिध्द केल्या जातील..

इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.

9168567111

# आई सोडून गेली, पण सिव्हिल स्टाफने दिलं आईचं प्रेम

**सांगली । प्रतिनिधी**

सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमधून बाळाला जन्म देऊन आई पळाली. त्यानंतर तब्बल तीन महिने सिव्हिल स्टाफने त्या पुरुष जातीच्या बाळाचा सांभाळ केला. आज हे बाळ पुण्याला पाठवण्याची वेळ आली त्यावेळी सिव्हिलच्या स्टाफने बाळाचे नामकरण केले. यावेळी आईविना पोरका झालेल्या बाळाचे नाव वीरप्रताप ठेवब्यात आले. शासनाच्या आदेशाने हा तीन महिन्याचा वीरप्रताप पुण्याकडे रवाना झाला. वीरप्रतापला निरोप देताना त्याचा सांभाळ करणाऱ्या स्टाफला रडू कोसळले. सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या स्टाफकडून हा हृदयस्पर्शी काम केले.

सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये २६ नोव्हेंबर २०२५ रोजी या बाळाचा जन्म झाला. जन्म देऊन दुसऱ्याच दिवशी त्या बाळाची आई बाळाला सोडून पळून गेली. आईचा शोध घेतला मात्र आढळून आले नाही. त्यातच बाळ शारीरिक दृष्ट्या नाजूक असल्याने त्या बाळाचा सांभाळ तेथीलच स्टाफने करण्याचा निर्णय घेतला. तब्बल १५ दिवस बाळाला आयसीयू मध्ये ठेवण्यात आले होते. या दरम्यान बाळाला हर्निया झाल्याचेही समोर आले. त्यावर ऑपरेशन सुद्धा करण्यात आले. त्यानंतर आज पर्यंत हे बाळ सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या विशेष नवजात शिशु दक्षता केंद्रातील स्टाफ सांभाळत होते. तब्बल तीन महिने या बाळाचा सांभाळ केलेल्या बाळाला कोर्टाच्या आदेशाने आज पुण्याला पाठवण्यात आले. याबाबतचे कायदेशीर



सोपस्कार पूर्ण करून पाठक शिशु केंद्राकडे हे बाळ अधिष्ठाता प्रकाश गुरव यांनी सुपूर्त केले.

तत्पूर्वी सिव्हिलच्या सर्व नर्सिंग स्टाफने बाळाच्या नामकरणाची तयारी केली. पाळणा सजवण्यात आला. रांगोळ्या काढण्यात आल्या. फुग्यानी सजावट करण्यात आली. यावेळी या अनाथ बाळासाठी पाळना सुद्धा म्हटलं. यावेळी आईविना पोरका झालेल्या बाळाचे नाव सर्वांनी मिळून वीरप्रताप ठेवण्यात आले. शासनाच्या आदेशाने हा तीन महिन्याचा वीर प्रताप आज पुण्याकडे रवाना होणार होता. त्यामुळे त्याला निरोप देण्यासाठी सांगली सिव्हिल हॉस्पिटलमधील सर्व स्टाफ एकत्र आला होता. यावेळी तीन महिने सांभाळ केलेल्या बाळाला पाठवताना येथील स्टाफला गहिवरून आले तर काहींना रडू कोसळले.

जन्म झाल्यावर आईचे छत्र गेले मात्र सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमधील प्रत्येक नर्स, डॉक्टरनी या बाळाला तीन महिने आईचे प्रेम देऊन सांभाळ केला. त्यामुळे या यीन महिन्याच्या वीर प्रतापला निरोप देताना अनेकांना अश्रू रोखता आले नाहीत. आईविना सांभाळलेल्या विरप्रतापने जाताना मात्र शेकडो आई निर्माण केल्या.

## संपादकीय...

### भोंदू बाबांचे वाढते जाळे

राज्यात अलीकडच्या काळात उघडकीस येत असलेल्या भोंदू बाबांच्या घटनांनी समाजाला गंभीर प्रश्नांपुढे उभे केले आहे. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणानंतर आता वसईतील ऋषिकेश वैद्य प्रकरण समोर आले असून, श्रद्धा आणि अध्यात्माच्या नावाखाली सुरू असलेले फसवणूक व लैंगिक शोषणाचे प्रकार किती खोलवर रुजले आहेत, याची जाणीव पुन्हा एकदा झाली आहे. या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे आरोपीने धार्मिक भावनांचा अत्यंत योजनाबद्ध पद्धतीने गैरफायदा घेतला. 'मी शंकर आहे, तू पार्वती आहेस' अशा भावनिक आणि धार्मिक भाषेचा वापर करून त्याने पीडित महिलेचा विश्वास संपादन केला. ही केवळ एक व्यक्तीची फसवणूक नाही, तर समाजातील अंधश्रद्धा आणि आंधळ्या विश्वासाचे दुष्परिणाम किती भयावह असू शकतात, याचे हे ठळक उदाहरण आहे. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे लोकांपर्यंत पोहोचण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे. परंतु याच माध्यमाचा गैरवापर करून काही भोंदू व्यक्ती स्वतःला धर्मगुरू, साधू किंवा आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून सादर करतात. धार्मिक पोस्ट, प्रवचन आणि तथाकथित अध्यात्मिक मार्गदर्शनाच्या आडून ते लोकांचा विश्वास जिंकतात आणि नंतर त्याचा गैरफायदा घेतात. विशेषतः मानसिक किंवा भावनिक आधार शोधणाऱ्या महिलांना अशा जाळ्यात अडकवले जाते, ही बाब अधिक चिंताजनक आहे. या घटनांमधून एक महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो, तो म्हणजे अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव. अनेकजण वैयक्तिक अडचणी, कौटुंबिक समस्या किंवा मानसिक तणावातून बाहेर पडण्यासाठी तथाकथित बाबांकडे धाव घेतात. परंतु अशा ठिकाणी योग्य मार्गदर्शन मिळण्याऐवजी फसवणूक आणि शोषणाला सामोरे जावे लागते. त्यामुळे समाजात वैज्ञानिक विचारसरणी आणि विवेक जागृत करण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवते. यासोबतच कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेसमोरही हे एक मोठे आव्हान आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये पीडित व्यक्ती अनेकदा भीतीमुळे किंवा सामाजिक बदनामीच्या भीतीने तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे आरोपी दीर्घकाळ मोकाट फिरत राहतात आणि अधिक लोकांना जाळ्यात ओढतात. त्यामुळे पोलिसांनी अशा प्रकरणांकडे संवेदनशीलतेने पाहून त्वरित कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे. सरकारनेही अंधश्रद्धा निर्मूलनासाठीचे कायदे अधिक प्रभावीपणे राबवण्याची आवश्यकता आहे. जनजागृती मोहिमा, शाळा-कॉलेजांमधील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार, तसेच सोशल मीडियावर चुकीच्या माहितीविरुद्ध कठोर पावले उचलणे, या सर्व गोष्टींची अंमलबजावणी वेळेची गरज आहे. समाजाच्या पातळीवरही प्रत्येकाने जागरूक राहणे आवश्यक आहे. कोणतीही व्यक्ती स्वतःला देवाचा अवतार असल्याचा दावा करत असेल, तर त्यामागील सत्य तपासणे गरजेचे आहे. श्रद्धा ही वैयक्तिक बाब असली तरी ती विवेकबुद्धीच्या कसोटीवर तपासली गेली पाहिजे. वसईतील ही घटना केवळ एक गुन्हा नसून समाजाला दिलेला इशारा आहे. अंधविश्वासाच्या आड लपलेल्या अशा भोंदू प्रवृत्तींचा वेळीच पर्दाफाश करणे आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करणे, हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. अन्यथा अशा घटनांची पुनरावृत्ती थांबवणे कठीण होईल.

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा

स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवते. भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा २२ मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.

भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस पाणी आणि महिला सक्षमीकरण या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे.

**जलसंकट : असमानतेचा प्रश्न**

पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे. हवामान बदल, लोकसंख्यावाढ,औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो.

**पाणीटंचाईत महिलांचे सर्वाधिक शोषण**

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, जगभरातील १ अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते. ५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती.

अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे १,००० बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही. हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे.

**महिला जलव्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी हव्यात**

भारतीय संविधानामुळे स्त्री-पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे. आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे.मात्र ही स्त्री समानता आत्ता जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे.



संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना 'पाणी आणणाऱ्या भूमिकेतून 'पाणी नियोजन करणाऱ्या भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

**पाणी आणि अर्थव्यवस्था : अदृश्य नाते**

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**जागतिक उपाययोजना : बदलाची दिशा**

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत.

पाणी अडवा - पाणी जिरवा : प्रभावी उपाय

पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते.

शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

**भारतातील प्रयत्न : धोरण आणि अंमलबजावणी**

भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेत-जल जीवन मिशन - प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना,मुख्यमंत्री जलसंधारण योजना,नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

**प्रत्येक नागरिकाची भूमिका**

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे.पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो. जसे की,नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे,रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर,ठिबक सिंचनाचा वापर पाण्याचा अपव्यय टाळणे,वृक्षारोपण करणे,घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे,पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे.यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला !तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई मुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया.. कारण पाणी वाचवणे म्हणजेच समाजाचे भविष्य सुरक्षित करणे होय.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर


## भोंदूबाबा अशोक खरातचे धक्कादायक रहस्य उघड: १००+ व्हिडिओ, खोटं नाव आणि काळे कारनामे

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याच्याबद्दल धक्कादायक खुलासे होताना दिसत आहे. काल स्वत: राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशोक खरातचे काळे कारनामे उघड केले. पोलिसांकडून अशोक खरातची चौकशी केली आहे.

सात गुन्हे आतापर्यंत त्याच्यावर दाखल करण्यात आले. महिलांवर लैंगिक अत्याचार करतानाचे त्याचे काही फोटोही पुढे आली आहेत. हेच नाही तर राज्यातील सनदी अधिकारी आणि बड्या नेत्यांसोबत त्याचे घरचे संबंध होते. पोलिसांच्या हाती लैंगिक अत्याचार करतानाचे १०० पेक्षा अधिक व्हिडीओ लागली आहेत.

अशोक खरात याचे पाय खोलात असल्याचे स्पष्ट आहे.




विदेशात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या भोंदू अशोक खरात याला अत्यंत शिताफीने पोलिसांनी अटक केली. विशेष म्हणजे अत्यंत गुप्तता पाळत पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून भीती घालून हा महिलांवर अत्याचार करत. लहान मुली, गरोदर महिला देखील या लिंग पिसाट अशोक खरातने सोडल्या नाहीत.

हेच नाही तर अशोक खरात याने काही नरबळी दिल्याचेही सांगितले जात आहे. याबाबतची चौकशी सध्या सुरू आहे. अशोक खरात याच्याबद्दल धक्कादायक माहिती पुढे आली. भोंदू अशोक खरातबाबत शैक्षणिक खुलासा झाला. स्वतःला 'कॅप्टन' म्हणवणारा खरात दहावी फेल असल्याची मोठी माहिती पुढे आली. यासोबतच अशोक खरात याने आपले नावही बदलले आहे

अशोक खरातचे खरे नाव अशोक खरात नाही, त्याचे हे नाव बदलून घेतलेले आहे. अशोक खरात हा दोन विषयांत नापास दहावीत झाला. विशेष म्हणजे त्याचा गणित हा विषय गेला होता. अंकशास्त्र तज्ज्ञ असल्याचा दावा, पण दहावीत तो गणितातच नापास होता. शाळेच्या नोंदीत मूळ नाव 'लक्ष्मण एकनाथ खरात' असे भोंदू अशोक खरातचे आढळून आले आहे.

त्याने नंतर नाव बदलून अशोककुमार केल्याची शक्यता आहे. १९८३ च्या दहावी परीक्षेत त्याला फक्त ३५,८६ टक्के गुण मिळाले होते. तरीही भविष्य आणि अंकशास्त्राच्या नावाखाली लोकांची फसवणूक करत होता. दहावी पास असलेल्या अशोक खरात याने मोठी जंगी मालमत्ता लोकांना पागल बनून कमावली. राज्यातील अनेक भागात भोंदू खरातच्या मालमत्ता आहेत.

## पुण्यात मेट्रो सुरक्षिततेसाठी कडक नियम; पेठांतील बांधकामांवर निर्बंध

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील पेठ भागात सुरू असलेल्या बांधकामांमुळे भूमिगत मेट्रो प्रकल्पाला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता महापालिकेने मोठा निर्णय घेतला आहे. अलीकडेच बोरवेल खोदकामादरम्यान मेट्रो बोगद्याला भगदाड पडल्याच्या घटनेनंतर प्रशासन सतर्क झाले असून, आता अशा सर्व बांधकामांसाठी स्वतंत्र आणि कडक नियमावली तयार करण्यात येणार आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, पेठांमधील परिसर दाटीवाटीचा असल्यामुळे मेट्रो भूमिगत करण्यात आली आहे. मात्र या बोगद्याच्या वर सुरू असलेल्या बांधकामांमुळे भविष्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे रिडेव्हलपमेंट किंवा नवीन बांधकाम करताना कडक नियमांचे पालन अनिवार्य करण्यात येणार आहे.




महापालिका लवकरच नवीन नियमावली जाहीर करणार असून, भूमिगत मेट्रोच्या वर असलेल्या सर्व बांधकामांसाठी विशेष अटी लागू केल्या जातील. यामध्ये बांधकाम करताना तांत्रिक तपासणी, सुरक्षा उपाययोजना आणि परवानग्यांची प्रक्रिया अधिक कठोर केली जाणार आहे.

आतापर्यंत बांधकाम परवानगी घेतल्यानंतर ठेकेदार बोरवेल खोदकामही करत होते. मात्र नव्या नियमांनुसार बोरवेलसाठी स्वतंत्र परवानगी घेणे बंधनकारक केले जाणार आहे. भूजल विभागाची मंजुरी घेतल्याशिवाय खोदकाम करता येणार नाही. स्वारगेट-शिवाजीनगर मार्गावरील मेट्रो बोगद्याला भगदाड पडल्याच्या घटनेनंतर मेट्रो प्रशासन आणि महापालिका दोन्ही यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी तांत्रिक तपासणी आणि मॉनिटरिंग यंत्रणा अधिक मजबूत करण्यात येणार आहे.

पेठ भागातील अनेक वाड्यांचे पुनर्विकास प्रलंबित आहेत. नव्या नियमावलीमुळे या प्रकल्पांवर काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र शहराच्या सुरक्षिततेला प्राधान्य देतच हे निर्णय घेतले जात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# लैंगिक छळ तक्रार निवारण समिती स्थापन करावी - महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांची मा. सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली असून सर्व राज्ये व केंद्र शासित प्रदेशांना कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध,

मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ ची देशभरात प्रभावी आणि काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

यासाठी ज्या कार्यालयामध्ये आस्थापनामध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा सर्व शासकीय विभाग आणि खासगी आस्थापनांमध्ये अंतर्गत समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत.

यानुसार खाजगी कार्यालयांनी https://shebox.wcd.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करून आपल्या जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी यांच्याकडे अद्यायावत करावी. कार्यालयाची माहिती अद्ययावत करून तसेच हीच माहिती केंद्र शासनाच्या shebox.wcd.gov.in या पोर्टलवर अद्ययावत करण्यात यावी. यानुसार भारतातील ड्हशलेुॅीरिश्र वर अद्यापपर्यंत शासकीय ९५,९५० तर खासगी ६४,५५८ अशा एकूण १,६०,५०८ आस्थापनांनी नोंदणी केलेली आहे.

यापैकी महाराष्ट्रातील आस्थापनांची संख्या शासकीय ६,८९० तर खासगी १५,१६२ अशी एकुण २२,०५२ इतकी असल्याचे महिला व बालविकास आयुक्तालयाचे उपआयुक्त (नियंत्रण मंडळ) राहूल मोरे यांनी कळविले आहे. सदर नियमाचे पालन न केल्यास नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

ज्या आस्थापनांना कार्यालयांमध्ये सदर दर्शनी भागात महिला तक्रार निवारण समितीचा फलक न दिसल्यास त्याविषयी तक्रार १८१ या टोल फ्री क्रमांक अथवा https://shebox.wcd.gov.in या वेबसाईटवर तक्रार नोंदविण्यात यावी, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

## थोडक्यात

### राज्यात इंधनसाठा मुबलक; पेट्रोल, डिझेल व एलपीजी पुरवठा सुरळीत

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील इंधनपुरवठ्याबाबत कोणतीही टंचाई नसून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या - हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि इंडियन ऑइल (आयओसीएल) - यांच्या माध्यमातून राज्यभर इंधनाचे वितरण नियमित आणि सुरळीतपणे सुरू असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ रोजी राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक असून, पेट्रोलचा साठा २,०५,२३२ किलोलीटर, डिझेलचा साठा ४,६७,६०३ किलोलीटर तर एलपीजीचा साठा ३०,७६७ मेट्रिक टन इतका उपलब्ध आहे. हा साठा राज्याच्या गरजा पूर्ण करण्यास पुरेसा आहे.

तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्पादनात वाढ करण्यात आली असून सर्व उत्पादक कंपन्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे तेल विपणन कंपन्यांना नियमितपणे पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा होत आहे आणि पुरवठा साखळीमध्ये कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही.

राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा व नियमित साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून संबंधित विभागांकडून सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. याशिवाय, खासगी क्षेत्रातील कंपन्यांकडे देखील पेट्रोलियम पदार्थांचा साठा उपलब्ध असल्याने एकूण पुरवठा अधिक सक्षम झाला आहे.

नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये. भीतीपोटी इंधनाचा साठा करण्याचा प्रयत्न करू नये किंवा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करू नये. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, ज्यामुळे वाहतूक कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

तसेच, इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व संबंधित कंपन्यांकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून यावर नागरिकांनी विश्वास ठेवावा. कोणतीही शंका किंवा माहिती जाणून घेण्यासाठी केवळ अधिकृत शासकीय माध्यमांवरच अवलंबून राहण्याचे आवाहन अन्न नागरी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे. सद्यस्थितीत केंद्र व राज्य शासन इंधन पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण ठेवून परिस्थिती प्रभावीपणे हाताळत आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता शांतता व संयम राखून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

### राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचा आंतरराष्ट्रीय ‘व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर’ पुरस्काराने गौरव

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना अमेरिकेतील युएस इंडिया एसएमई कौन्सिल तर्फे प्रदान करण्यात येणारा आऊटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर’ हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे २५ मार्च २०२६ रोजी आयोजित भव्य समारंभात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. या समारंभास अमेरिकेतील मेरीलँड राज्याचे काउंटी एक्झिक्युटिव्ह मार्क अर्लिख, आंध्र प्रदेशचे एमएसएमई व एनआरआय रिलेशन्स मंत्री कोंडापल्ली श्रीनिवास, यूएस इंडिया एसएमई कौन्सिलचे चेअरमन सुधाकर गंधे, सीईओ एलिझा पुलिवार्थी तसेच नीरज खैरवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. भारत आणि अमेरिकेतील अनेक उद्योजकही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्यासह ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवलेल्या उपक्रमांमुळे त्यांना हा सन्मान मिळाला आहे.

# प्रेमसंबंधासाठी पत्नीचा बळी; साकीनाका प्रकरणात पतीसह चौघे अटकेत

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील साकीनाका परिसरातून एक थरारक आणि तितकाच धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आपल्या प्रेयसीसोबत राहण्याच्या हव्यासापोटी एका पतीने चक्क स्वतःच्या पत्नीच्या हत्येचा कट रचल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे सुरुवातीला अनेकांना हा प्रकार आत्महत्येचा वाटत होता. मात्र वडिलांच्या जिद्दीमुळे आणि दीड वर्षांच्या पाठपुराव्यानंतर हा हत्येचा कट असल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी साकीनाका पोलिसांनी पतीसह चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

१४ ऑक्टोबर २०२४ रोजी साकीनाका येथील संघर्ष नगरमध्ये राहणाऱ्या नारंगी उर्फ गीता चौधरी (३४) यांचा मृतदेह त्यांच्या घरातील स्वयंपाकघरातील पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला होता. सुरुवातीला पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून ही घटना आत्महत्या असल्याचे म्हटले. याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंदही करण्यात आली. यानंतर मृतदेहाचे मुंबईतील रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झाले नव्हते, ज्यामुळे हे प्रकरण बंद होण्याच्या मार्गावर होते.



यानंतर नारंगी यांचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी त्यांच्या मूळ गावी राजस्थानला नेण्यात आला. मात्र, तिचे वडील भाना राम चौधरी (६६) यांना आपल्या मुलीने आत्महत्या केली, यावर विश्वास बसत नव्हता. त्यांनी हत्येचा संशय व्यक्त करत राजस्थानमध्ये तक्रार दाखल केली. वडिलांच्या अथक प्रयत्नांनंतर, दफन केलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर राजस्थानमध्ये पुन्हा शवविच्छेदन करण्यात आले. या दुसऱ्या अहवालात नारंगी यांचा मृत्यू गळा दाबल्यामुळे झाल्याची धक्कादायक बाब समोर आली.

यानंतर मग वडिलांनी याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. यानंतर मुंबई पोलिसांच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी पती सकाराम चौधरी (३६) याचे डिंपल नावाच्या महिलेशी प्रेमसंबंध होते. त्याच्या प्रेमसंबंधात पत्नी अडथळा ठरत होती. पत्नीला वाटेतून दूर करण्यासाठी त्याने यापूर्वी दोनदा प्रयत्न केले होते. यासाठी त्याने एकदा बनावट रस्ते अपघात आणि दुसऱ्यांदा मारहाण करून तिला मारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र हे दोन्हीही प्रयत्न फसले. यानंतर अखेर त्याने आपल्या मित्राला शंकर डांगीला ६.७० लाख रुपयांची सुपारी दिली. यानंतर १४ ऑक्टोबर रोजी सकारामने दोन साथीदार बाबू गायरी आणि दिनेश गायरी यांच्या मदतीने पत्नीचा दोरीने गळा दाबून खून केला. यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पंख्याला लटकवला. जेणेकरून तो आत्महत्येचा बनाव वाटेल. यानंतर साकीनाका पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि संशयावरून सकारामची कसून चौकशी केली. तीनवेळा त्याने पोलिसांना गुंगारा दिला, मात्र चौथ्या फेरीच्या चौकशीत त्याने आपला गुन्हा कबूल केला. पोलिसांनी या प्रकरणात सकाराम चौधरी, शंकर डांगी, बाबू गायरी आणि दिनेश गायरी या चार आरोपींना अटक केली आहे.

# खरातशी संबंधांच्या संशयावरून अधिकाऱ्याची तडकाफडकी बदली

**नाशिक । प्रतिनिधी**



सध्या राज्यभरात चर्चेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी नवनवीन अपडेट समोर येत आहेत. अशोक खरात प्रकरणी अनेक राजकीय नेत्यांचे फोटो समोर आले होते. आता या राजकीय नेत्यांनंतर प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आले आहेत. शेकडो महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीचे आरोप असलेल्या खरातशी संबंध असल्याच्या संशयावरून मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली आहे. त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. त्यामुळे आता मंत्रालयातील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल आणि वन विभागाने २४ मार्च २०२६ रोजी विशेष आदेश जारी केला आहे. त्यानुसार, मुंबईतील वांद्र्यातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथे उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अभिजीत भांडे पाटील यांची प्रतिनियुक्ती लोकहितास्तव तातडीने संपुष्टात आणली आहे. त्यांना २४ मार्चच्या दुपारनंतर सध्याच्या पदावरून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांना मंत्रालयातील महसूल व वन विभागात तात्काळ रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, अभिजीत भांडे पाटील यांचे अशोक खरातशी जवळचे संबंध असल्याचे उघड झाले आहे. खरातच्या पत्नीच्या आणि मुलीच्या नावे असलेल्या जमिनींमध्ये भांडे पाटील यांनी गुंतवणूक केल्याचा संशय वर्तवला जात आहे. खरातशी संबंधित अनेक व्यवहारांमध्ये या अधिकाऱ्याचा सहभाग असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या कारवाईमुळे खरातच्या संपर्कात असलेल्या इतर महसूल अधिकाऱ्यांचेही धाबे दणाणले आहेत.

याआधीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना या प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. खरातच्या एका ट्रस्टमध्ये त्या संचालिका होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात कोणाचीही गय केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच दोषी आढळणाऱ्या सर्व राजकारणी आणि अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान अशोक खरातच्या गुन्ह्यांची व्याप्ती मोठी असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट होत आहे. खरातने एल्विश हनी नावाचे मध तुर्कीच्या समुद्रातील खोल गुहेतून आणल्याचा बनाव करून चक्क ९ लाख रुपये प्रति किलो दराने विकल्याचे समोर आले आहे. लैंगिक समस्या असलेल्या लोकांना हे मध शक्तिवर्धक असल्याचे सांगून लुटले जात होते. यातून मिळालेला काळा पैसा विविध ट्रस्टच्या नावावर वळवून तो पांढरा करण्याचा खरातचा प्रयत्न होता.

# पुण्यात बोअरवेलमुळे मेट्रो बोगद्यात पाणी

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यातील स्वारगेट-पिंपरी येथे अजब प्रकार घडला आहे. येथील भूमिगत मेट्रो मार्गात पाणी जमा व्हायला लागले आहे. यामागचे कारणही तसेच अजब आहे. याच भागातील एका घरमालकाने घराच्या परिसरात बोअरवेल घेतल्याने मेट्रोच्या बोगद्यात पाणी पाझरत आहे. हा प्रकार समोर आल्यानंतर आता या मालकाविरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. दुसरीकडे या घटनेमुळे मेट्रो प्रशासनाचे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

या घटनेमुळे पुणे भूमिगत मेट्रोची सुरक्षा धोक्यात आल्याचे म्हटले जात आहे. बोअरवेलमुळे मेट्रो मार्गिकेत पाणी गळतीला सुरुवात झाली आहे. धनंजय मोटे असे घराच्या परिसरात बोअरवेल घेणाऱ्या घरमालकाचे नाव आहे. या प्रकरणी खडक पोलिसांनी घरमालक तसेच ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घराखालून भूमिगत मेट्रो मार्गिका गेली असल्याची माहिती असताना शुक्रवार पेठेतील धनंजय मोटे नामक घरमालकाने बोरवेल घेतल्याने हा प्रकार घडला. बोअरवेलमुळे स्वारगेट पिंपरी भूमिगत मेट्रो मार्गिकेत पाणी गळती सुरू झाली. छत्रपती शिवाजी महाराज रस्ता परिसरात ही घटना घडली.

हा प्रकार समोर येताच मेट्रोतील अधिकाऱ्यांनी याबाबत खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. मिळालेल्या माहितीनुसार मेट्रो मार्गिकेचा हा बोगदा जमिनीपासून साधारण ८० ते १०० फूट खोल आहे. बोगद्यात सहा इंच भेग पडल्याने ही पाणीगळती होत आहे. त्यामुळे मेट्रोच्या सुरक्षेविषयी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या घटनेमध्ये मेट्रो प्रशासनाचे मात्र २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तर दुसरीकडे आरोपी घरमालकाने मात्र हे सर्व आरोप फेटाळले आहेत. आम्ही बोअरवेल घेताना मार्यादीत स्वरुपातच जमिनीत ड्रिलिंग केली. आम्हाला फक्त २४ फुटानंतर पाणी लागले. त्यामुळे आम्ही आणखी खोल ड्रिलिंग केली नाही. त्यामुळे बोअरवेल घेताना भूमिगत मेट्रोच्या छताला कशी हानी झाली, याबाबत आम्हाला कल्पना नाही, असे या घरमालकाने सांगितले आहे. त्यामुळे आता या प्रकरणी भविष्यात काय होणार? मेट्रोच्या सुरक्षेला धोका निर्माण होणार का? प्रशासन याबाबत काय खबरदारी घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# महसूल विभागाशी सबंधित विविध विषयांबाबत परिपूर्ण माहिती सादर करा - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**



मिरा भाईंदर शहरातील महसूल विभागाशी सबंधित विविध विषयांवर मंत्रालयात बैठक घेतली जाईल यासंदर्भात आवश्यक परिपूर्ण माहिती सादर करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मिरा-भाईंदर शहरातील महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्नांबाबत बैठक झाली. बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, आमदार नरेंद्र मेहता, महसूल विभागाचे सहसचिव सत्यनारायण बजाज, सहसचिव जायभाये उपस्थित होते. तसेच मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधा बिनोद शर्मा, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ हे दूरदृश्य प्रणाली द्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

भाईंदर येथील जुना सर्व्हे क्र. ६६३ (नवीन सर्वे क्र. २३७) या वर्ग-२ शासकीय जमिनीच्या संदर्भात सविस्तर आढावा घेताना मंत्री श्री बावनकुळे म्हणाले, शासकीय जमिनीवरील अवैध व्यावसायिक वापर करून शर्तभंग व नियमभंगबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी सर्वे नंबरनिहाय माहिती सादर करावी.

# मिरा-भाईंदर हादरले! घरकामगार महिलेवर चाकूचे वार

**मुंबई । प्रतिनिधी**

मिरा-भाईंदरमधील काशीमिरा परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. ४० वर्षीय महिला घरकामगाराची निर्घृण हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमन नावाची ही महिला चंदेश ॲकॉर्ड या निवासी संकुलात अनेक घरांमध्ये घरकाम करत होती. मंगळवारी चंदेश ॲकॉर्ड बिल्डिंग क्रमांक २७ मधील एका घरात तिची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली.

आरोपीने तिच्यावर चाकूने वार केले असून, तिच्या पोटात दोन, छातीत एक आणि मानेवर एक असे गंभीर वार करण्यात आले. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली होती. जखमी अवस्थेत तिला तात्काळ गुरुकृपा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच काशीमिरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सध्या पोलिसांसह फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सुरु आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.



नाशिकच्या मालेगावात मागील भांडणाची कुरापत काढून सात ते जणांच्या टोळक्याने एकावर लाठ्या - काठ्या, कोयता, तलवारीने सपासप वार करून ठार केले. मारहाणीचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सलीम शेख असे हत्या करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. मालेगावच्या अख्तराबाद भागातून सलीम शेख जात असताना सहा ते सात जणांनी त्याचा पाठलाग करून निर्दयीपणे त्याच्यावर वार केल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. मृत सलीम शेख याच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून हल्लेखोराविरुद्ध पवारवाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस हल्लेखोरांचा शोध घेत आहे.

# ‘दैवी शक्ती’च्या नावाखाली अत्याचार

**नाशिक । प्रतिनिधी**

स्वत:ला ‘कॅप्टन’ म्हणवून घेणारा, अंकशास्त्रज्ञ, ज्योतिषी असल्याचा दावा करणारा भोंदूबाबा अशोक खरात (हा किती बोगस, विकृत आहे, याची एकेक धडकी भरवणारी माहिती उघड होत आहे.

महिलांवर लैंगिक अत्याचाराच्या आरोपखाली त्याला १७ मार्चला अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्याचे अनेक कारनामे समोर यायला लागले असून त्याच्या अत्याचाराला बळी पडलेल्या काही महिला धाडस दाखवत पुढे येत आहेत. अनेकींनी आपबिती कथन करत खरात याच्याविरोधात पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. आत्तापर्यंत खरात याच्याविरोधात ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महिलांना फसवून, त्यांना भीती घालून अत्याचार करणाऱ्या खरातचा एक नवा करनामाही आता समोर आला असून त्याने वासनेसाठी अल्पवयीन मुलीलाही लक्ष्य केल्याचं उघड झालंय.

खरातला अटक झाल्यानंतर आता अनेक पीडिता समोर आल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील एका अल्पवयीन मुलीनंही धाडस धाकवत खरातविरोधात तक्रार दाखल केली आहे. अशोक खरातने आपल्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तिने पोलिसांसमोर केला आहे. यामुळे खरातच्या अडचणीत आणखीन वाढ होण्याची शक्यता आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ही पीडित मुलगी अल्पवयीन असून ती अहिल्यानगरची रहिवासी आहे. काही महिन्यांपूर्वी तिचा भोंदू खरातशी संपर्क झाला. माझ्याकडे दैवी शक्ती आहे, मी शंकराचा अवतार आहे असा दाव करत खरात याने त्या मुलीला जाळ्यात ओढलं. शैक्षणिक अडचणी दूर करण्यासाठी विशिष्ट पूजा करावी लागेल, असं त्याने तिला सांगितल्याचा दावा मुलीने केला आहे. त्यानंतर खरातने मुलीचा विश्वास संपादन केला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला, असा आरोप करत त्या अल्पवयीन मुलीने सरकारवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. खरातने अल्पवयीन मुलीलाही लक्ष्य केल्याने खळबळ उडाली असून त्याच्या अडचणी दिवसेंदिवस वाढतच असल्याचे दिसत आहे. त्याने इतरही काही अल्पवयीन मुलींना जाळ्यात ओढत अत्याचार केले का याचा तपास सुरू आहे.

भोंदू अशोक खरात प्रकरणात पोलिस तपासाला नवं वळण लागलं आहे. याप्रकरणात बड्या आयुर्वेदिक औषधे व जडीबुटी दुकानाच्या मालकाची चौकशी होणार आहे. खरातने या दुकानातून हरिणाची कस्तुरी व जडीबुटी खरेदी केल्याचा संशय आहे, तसेच नाशिकरोड परिसरातील एक ज्वेलरही पोलिसांच्या रडारवर असून संबंधित ज्वेलर्सकडून बनावट रत्नांची खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे.

अंधश्रद्धा व फसवणूक प्रकरणातील पुरावे जोडण्याचा पोलिसांचा प्रयत्न सुरू आहे.

## संक्षिप्त

### वखारीचा ऑलिम्पियाड मध्ये दैदिप्यमान निकाल

**वखारी । प्रतिनिधी**

ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूल, वखारी येथील विद्यार्थ्यांनी यंदाच्या आंतरराष्ट्रीय गणित व विज्ञान ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक उंचावला आहे. विविध इयत्तांमधील तब्बल ४१ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके पटकावत शाळेसाठी अभिमानास्पद कामगिरी नोंदवली असून हा निकाल शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठोस पुरावा ठरला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा, तर्कशक्तीचा, समस्या सोडविण्याच्या कौशल्याचा तसेच संकल्पनात्मक आकलनाचा कस लावणाऱ्या मानल्या जातात. गणित आणि विज्ञान ऑलिम्पियाड या परीक्षा केवळ पाठांतरावर आधारित नसून विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती, विश्लेषण क्षमता व अचूकतेची चाचणी घेतात. त्यामुळे अशा परीक्षांमध्ये मिळवलेले यश हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेचे द्योतक मानले जाते.

गणित ऑलिम्पियाडमध्ये इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. इयत्ता १ ली मधील शौर्य प्रविण क्षीरसागर, यशराज पांडुरंग मोहिते व अथर्व भगवान क्षीरसागर यांनी स्कूल रँक १ मिळवत सुवर्णपदके पटकावली. इयत्ता २ री मधील युवराज ढाकणे प्रथम, शिवराज वाघमारे द्वितीय, तर गायत्री तिरुखे व श्रीकांत डोंगरे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. इयत्ता ३ री मध्ये भैरवी मेहत्रे प्रथम, रुद्र पिंपळे द्वितीय, समाधान चव्हाण तृतीय ठरले. तसेच धीरज ढाकणे, समर्थ साबळे व आर्यांश लांडगे यांनी अनुक्रमे चौथा, पाचवा व सहावा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता ४ थी मध्ये गणेश डीखुळे प्रथम, आरव लकडे द्वितीय, गायत्री चौधरी तृतीय, शंतनु कुलकर्णी चतुर्थ, स्नेहल शिंदे पाचवा व चैतन्य घुले सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता ५ वी मध्ये प्रेम बोरुडे प्रथम, यश चंद्रभान जारे द्वितीय व आर्या खरात तृतीय ठरले. इयत्ता ६ वी मध्ये प्रतीक्षा घुले प्रथम, ओमराज चव्हाण द्वितीय व विलास साबळे तृतीय क्रमांकावर राहिले. इयत्ता ७ वी मध्ये विशाल सरकटे प्रथम, सिद्धी उगले द्वितीय व अर्णव वाघमारे तृतीय आले. इयत्ता ८ वी मधील ऋतुजा साळवे हिने प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले.

विज्ञान ऑलिम्पियाडमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता ३ री मधील जयश्री कवडे व आराध्या इंगोले यांनी प्रथम क्रमांक मिळवला. इयत्ता ७ वी मध्ये आदित्य यशवंते प्रथम, युवराज पुंड द्वितीय व राणी तोडकर तृतीय ठरले. इयत्ता ८ वी मधील सम्यका भालमोडे व इयत्ता ९ वी मधील शिवकन्या थेटे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन दिले जाते. नियमित अभ्यासासोबतच ऑलिम्पियाड पद्धतीचे प्रश्न, सराव चाचण्या, वेळेचे व्यवस्थापन, तर्कशक्ती वाढविण्यासाठी उपक्रम तसेच संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विशेष वर्ग घेतले जातात. शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष देऊन त्यांच्या कमकुवत बाबींवर काम केले जाते.

याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी, आत्मविश्वास वाढावा आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतः ची छाप पाडता यावी यासाठी शाळा विविध स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन सत्रे व कार्यशाळा आयोजित करत असते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही मोठ्या व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध होत आहे.

या उल्लेखनीय यशाच्या निमित्ताने सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाळेत विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. शाळेचे अध्यक्ष भगवानराव खैरे सर व प्राचार्य अण्णाभाऊ भालमोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे देऊन त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाला पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पालकांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष ,प्राचार्य , शिक्षकवृंद व व्यवस्थापन समितीने सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले.

# निलंबनावर संभ्रम; कायदेशीर मतानंतरच अंतिम निर्णय होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशींच्या निलंबनाच्या मुद्द्यावर विधान परिषदेत मोठा पेच निर्माण झाला आहे. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिलेल्या निर्देशांनंतर सभापती राम शिंदे यांच्यासमोर निर्णय देताना अडचणी निर्माण झाल्या आहेत. वाद टाळण्यासाठी आणि निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये यासाठी सभापती राम शिंदे यांनी कायदेशीर आणि संविधानिक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन अंतिम निर्णय देण्याचे संकेत दिले आहेत.

सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीदरम्यान महायुतीतील शंभुराज देसाई आणि मकरंद पाटील या दोन मंत्र्यांना पोलिसांकडून धक्काबुक्कीचा प्रकार घडला. या प्रश्नी विधान परिषदेमध्ये दोन्ही मंत्र्यांनी आणि शिवसेनेच्या आमदारांनी साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशींच्या निलंबनाची मागणी केली. त्यावेळी तालिका अध्यक्षा असलेल्या नीलम गोऱ्हे यांनी सातारा पोलीस अधीक्षकांसह दोन पोलिसांच्या निलंबनाचे निर्देश दिले होते. या निर्देशांनंतर सभापती राम शिंदे यांनी हा निर्णय राखून ठेवला होता.

अधिवेशन संपत असताना हा मुद्दा पुन्हा एकदा विधान परिषदेत चर्चेला आला. सभापती राम शिंदे यांनी रुलिंग देताना उपसभापतींच्या कार्यक्षेत्राचा विचार करून चौकशी केल्यानंतरच निर्णय घ्यायला हवा होता, असे नमूद केले. यावर मंत्री शंभूराजे देसाई आणि शरद पवारांच्या



राष्ट्रवादीचे आमदार शशिकांत शिंदे यांनी थेट प्रश्न उपस्थित करत, निलंबनाचा निर्णय घेतला आहे की नाही? यावर स्पष्टता मागितली. त्यावर सभापतींनी थेट उत्तर देणे टाळल्यानं सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. सदस्यांकडून याबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत राहिल्याने अखेर सभागृह अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात आले. सभागृह पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती राम शिंदे यांनी या प्रकरणी कायदेशीर आणि संविधानिक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन अंतिम निर्णय दिला जाईल, असं स्पष्ट केलं.

मंत्री शंभूराजे देसाई यांनी माध्यमांना सांगितले की, उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा निलंबनाचा निर्णय मागे घेतलेला नाही. त्यावर कायदेशीर सल्ला घेतला जाणार आहे. दुसरीकडे, मंत्री दादा भुसे यांनीही सर्व अंगांनी विचार करून तज्ज्ञांच्या सल्ल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, असं सांगितलं. तर तुषार दोशींच्या निलंबनावर शिवसेना ठाम असल्याचं मत मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केलं. या प्रकरणामुळे विधान परिषदेत कार्यक्षेत्र, अधिकार आणि प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## कपडे विक्रेत्याकडे हप्ता मागणाऱ्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**



खडकी बाजारात कपडे विक्रेत्याकडे दरमहा पाच हजार रुपये हप्ता मागणाऱ्या एकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.सलमान शेख (वय २८, रा. खडकी) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत एका कपडे विक्रेत्याने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार कपडे विक्रेता दापोडी परिसरात राहायला आहेत. ते खडकी बाजारातील टिकाराम चौकात रॉयल हॉटेलसमोर कपडे विक्रीचा व्यवसाय करतात. आरोपी त्याठिक आल्यावर त्याने कपडे विक्रीसाठी दिलेल्या जागेसाठी दरमहा पाच हजार रुपये हप्ता द्यावा लागले.

हप्ता न दिल्यास जागा मोकळी करुन दे, अशी धमकी आरोपीने त्यांना दिली. आरोपीने दिलेल्या धमकीमुळे घाबलेल्या कपडे विक्रेत्याने खडकी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक दिग्विजय चौगले तपास करत आहेत.

## अफवांचा आधार घेऊन पेट्रोल पंपांची मनमानी; नागरिकांना तुटवड्याच्या नावाखाली वेठीस

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले असतानाही, काही पेट्रोल पंप चालकांकडून नागरिकांना संभ्रमात टाकणाऱ्या घटना समोर येत आहेत. समाजमाध्यमांवर पसरलेल्या अफवांचा आधार घेत, काही ठिकाणी कृत्रिम तुटवडा निर्माण केल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा पुरवठा विभागाने जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत स्पष्ट आदेश जारी करून दुचाकी वाहनांसाठी २०० रुपये व तीन/चारचाकी वाहनांसाठी २००० रुपयांपर्यंतच इंधन देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच कॅन, बाटल्या किंवा ड्रममध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात काही पेट्रोल पंपांवर या आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी कॅनमध्येही पेट्रोल-डिझेल देण्यात येत असल्याने प्रशासनाच्या आदेशालाच हरताळ फासला जात आहे. यामुळे सामान्य नागरिकांमध्ये नाराजी पसरली असून, तुटवडा या नावाखाली नागरिकांना वेठीस धरले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, अफवांमुळे नागरिकांकडून अनावश्यक गर्दी होत असल्याने रांगा वाढल्या आहेत आणि मागणी-पुरवठ्यात तात्पुरता असमतोल निर्माण झाला आहे. प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि गरजेपुरतेच इंधन घ्यावे. याशिवाय, रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक पेट्रोल पंपाने आपल्या साठ्याची माहिती दर्शनी फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि, काही पंप चालकांकडून नियमांचे उल्लंघन सुरूच असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## रुग्ण नसताना भरधाव अँब्युलन्स; चिमुरडीचा जीव गेला

**अमावती । प्रतिनिधी**

अमरावतीत भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. भरधाव रुग्णवाहिकेनं एका कारला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात पोलिस उपनिरीक्षक राहुल वानखडे यांच्यासह पत्नी जखमी झाली तर यामध्ये त्यांच्या आठ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्रिशा वानखडे असं त्यांच्या मुलीचं नाव होतं. अमरावती जिल्ह्यातील देवगाव चौफुलीवरील ही धक्कादायक घटना घडली आहे. अपघाताचा उउढत समोर आला आहे.

भरधाव रुग्णवाहिकेने धामणगाव रेल्वे तालुक्यातील देवगाव चौफुलीवर कारला जोरदार धडक दिल्याने मोठा अपघात घडल्याची घटना घडला. या भीषण अपघातात एका आठ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती माहिती मिळाली आहे. या घटनेची थरारक दृश्य सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहेत.



तळेगाव दशासर पोलिस ठाण्यातील पोलीस उप निरीक्षक राहुल वानखडे हे आपल्या पत्नी आणि ८ वर्षीय मुलीसह तळेगाव येथे खासगी चारचाकी वाहनाने जात असताना देवगाव चौफुलीवर धामणगाव वरून यवतमाळकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या अँब्युलन्स वाहनने कारला जोरदार धडक दिली. धडक एवढी जोरदार होती कि, त्यामध्ये पो. उप निरीक्षक राहुल वानखडे यांची कार चकणाचुर झाली असून त्यामध्ये त्यांची ८ वर्षीय मुलगी त्रिशा राहुल वानखडे हिचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर त्यांच्या पत्नी आणि ते स्वतः गंभीर जखमी असून त्यांच्यावर यवतमाळ येथे उपचार सुरु आहेत. तर रुग्णवाहिकेमध्ये कोणताही रुग्ण नसताना चालक भरधाव वेगाने गाडी चालवीत असल्याची प्राथमिक माहिती आहे. रुग्णवाहिका चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

८ वर्षीय मृतक त्रिशा वानखडे ही धामणगाव रेल्वे येथील एस ओ एस शाळेत येथे तिसऱ्या वर्गात शिकत होती. तिचा वर्गात प्रथम क्रमांक आल्याने त्या आनंदात पोलीस उपनिरीक्षक राहुल वानखडे हे आपल्या पत्नीसह शाळेत पेढे वाटण्याकरिता गेले होते. दरम्यान परत येत असताना देवगाव येथील पेट्रोलपंपवर पेट्रोल भरून परत तळेगाव दशासर येथे जातांना मोठी दुर्दैवी घटना घडली आहे.

# लिव्हिंग विलच्या माध्यमातून इच्छामरणाची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात हरीश राणा यांच्या इच्छामरणाच्या प्रकरणानंतर मुंबईतही इच्छामरणासाठी अर्ज होत असल्याची आकडेवारी समोर आली आहे. मुंबई महापालिकेकडे आतापर्यंत एकूण ८५ जणांनी इच्छामरणासाठी अर्ज सादर केले आहेत. मात्र, या अर्जांबाबत सुस्पष्ट धोरण आणि प्रक्रियेचा अभाव असल्याने पुढील कार्यवाहीबाबत प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे हे सर्व अर्ज लिव्हिंग विल स्वरूपातील आहेत. संबंधित व्यक्तींनी सध्या पूर्णपणे सुस्थितीत असताना, कोणत्याही गंभीर आजाराशिवाय हे विल तयार केले आहेत. या विलद्वारे त्यांनी भविष्यात अशी परिस्थिती निर्माण झाली की मृत्यू अटळ असेल आणि आयुष्य किती काळ शिल्लक आहे हे निश्चित सांगता येत नसेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार थांबवण्याची परवानगी दिली आहे.

महापालिकेने विविध प्रभागांतील मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे इच्छामरणा संदर्भातील अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी सोपवली आहे. मात्र, या प्रक्रियेबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे नसल्याने अर्जांची पुढील निर्णय प्रक्रिया अद्याप रखडलेली आहे. इच्छामरणाबाबत वाढती अर्जांची संख्या लक्षात घेता, यासंदर्भात स्पष्ट धोरण आणि अंमलबजावणीची गरज अधोरेखित होत आहे. अशा अर्जांची डिजिटल नोंद करण्यासाठी सरकारच्या शहरी विकास विभागाने पोर्टल तयार केले आहे, मात्र अद्याप महापालिका स्तरावर त्याची अंमलबजावणी झालेली नाही.



भारतात निष्क्रिय इच्छामृत्यू (पॅसिव यूथनेशिया) मिळवणारे पहिले व्यक्ती हरीश राणा यांचे मंगळवारी अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान येथे निधन झाले. ते २०१३ पासून कोमामध्ये होते आणि मागील १३ वर्षांपासून लाइफ सपोर्ट सिस्टीमवर अवलंबून होते. हरीश राणा हे पंजाब विद्यापीठातील बीटेकचे विद्यार्थी होते. २०१३ मध्ये चौथ्या मजल्यावरून पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती, त्यानंतर ते सतत कोमामध्ये होते. या काळात त्यांना कृत्रिम पोषण (न्यूट्रिशनल सपोर्ट) आणि अधूनमधून ऑक्सिजन सपोर्ट दिला जात होता.

३१ वर्षीय हरीश राणा यांना १४ मार्च रोजी गाझियाबाद येथील त्यांच्या घरातून दिल्लीतील डॉ. बी.आर. आंबेडकर इन्स्टिट्यूट रोटरी कॅन्सर हॉस्पिटलच्या पॅलिएटिव्ह केअर युनिटमध्ये दाखल करण्यात आले होते. याच्या तीन दिवस आधी, ११ मार्च रोजी, सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निर्णयात त्यांना निष्क्रिय इच्छामृत्यूची परवानगी दिली होती. रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या पोषण सहाय्याला हळूहळू कमी करण्यात आले. त्यानंतर लाइफ सपोर्ट सिस्टीम ठराविक वेळेनंतर काढून टाकण्यात आली. त्यानंतर काल त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

## धम्म साधना बुद्ध विहारात सम्राट अशोक जयंती उत्साहात साजरी



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील योगेश नगर, अंबड रोड येथील धम्म साधना बुद्ध विहारात सम्राट अशोक महाराज यांची जयंती उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाची सुरुवात सम्राट अशोक महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थितांनी बुद्ध वंदना, त्रिशरण पंचशील घेत सम्राट अशोकांच्या कार्याला अभिवादन केले.

# धनगर समाजाचे उपोषणकर्ते दिपक बो-हाडे यांच्या सास-याची आत्महत्या

## बोऱ्हाडे यांची उपोषणात तब्येत खालावत असल्याने टोकाचं पाऊल उचलल्याची चर्चा







बोऱ्हाडे यांच्या

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक २५ बुधवार रोजी रात्री ८ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरात एक धक्कादायक आणि हळहळ व्यक्त करणारी घटना समोर आली आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषण करत असलेल्या आंदोलक दिपक बोऱ्हाडे यांच्या सासऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज दुपारी दोन वाजेच्या सुमारास उघडकीस आली आहे.

मृत व्यक्तीचे नाव रामराव होळकर असे असून ते जालना शहरातील छत्रपती कॉलनी परिसरात दीपक बोऱ्हाडे यांच्या घरात राहत होते. मंगळवारी त्यांनी दीपक बोऱ्हाडे यांच्या घरी सिलिंग फॅनला कपडा बांधून गळफास घेत जीवन संपवल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, दिपक बोऱ्हाडे हे धनगर समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानात गेल्या काही दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. त्यांच्या प्रकृतीत दिवसेंदिवस बिघाड होत असल्याची माहिती आहे. याच चिंतेतून, त्यांच्या सासऱ्यांना मानसिक धक्का बसला आणि त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

या घटनेमुळे आंदोलकांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, समाजातूनही हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. ही घटना केवळ एका कुटुंबापुरती मर्यादित नसून, समाजातील तणाव आणि भावनिक ताण याचेही गंभीर चित्र समोर आणते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**